# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः20.06.2024** **वारःगुरुवार**

---

- खरीप हंगामासाठी चौदा पिकांसाठीची किमान आधारभूत किंमत वाढवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय.
- महाराष्ट्रात वाढवण इथ सर्व हवामानांमध्ये कार्यरत राहू शकणारं बंदर बांधणार.
- पंतप्रधान आजपासून दोन दिवसांच्या जम्मू-काश्मीर दौऱ्यावर.
- गैरप्रकारांबाबत माहितीमुळे यूजीसी-नेट जून परीक्षा रद्द. सीबीआयकडून तपास होणार.
- तमिळनाडूत विषारी दारूच्या सेवनामुळे २६ जणांचा मृत्यू.
- आणि
- टी-ट्वेंटी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना

**<u>पिकांची एमएसपी</u>**

चौदा पिकांसाठीची किमान आधारभूत किंमत म्हणजे एमएसपी वाढवण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. महाराष्ट्रात पालघर जिल्ह्यात वाढवण इथं बंदर विकसित करणं, गुजरात आणि तमिळनाडूमध्ये विंड टर्मिनल उभारणं, वाराणसी विमानतळ विकसित करणं आणि राष्ट्रीय न्यायवैद्यक पायाभूत सुविधा विकास योजना सुरू करणं असेही निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत घेण्यात आले.

माहिती आणि प्रसारणमंत्री आश्विनी वैष्णव यांनी काल माध्यमांना या निर्णयांची माहिती दिली. २०२४-२५ या वर्षाच्या खरीप हंगामासाठी चौदा पिकांच्या किमान आधारभूत किंमती वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भात, कापूस, भरडधान्यं, डाळी आणि तेलबियांच्या किमान आधारभूत किंमतींमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यात येणार आहे. देशभरात दोन लाख गोदामं उभारण्यावर सरकार काम करत आहे असं त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्रात वाढवण इथं पर्यावरणपूरक बंदर विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी ७६ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. या बंदराचं काम पूर्ण झाल्यानंतर जगातल्या आघाडीच्या दहा बंदरांपैकी ते एक असेल, असं वैष्णव म्हणाले. हे बंदर दोन टप्प्यांमध्ये विकसित करण्यात येईल आणि त्यात दोन कोटी तीस लाख वीस फूट लांबीची कंटेनर एककं म्हणजे टीईयू इतकी क्षमता असेल. या बंदरामुळे सुमारे वीस लाख रोजगारांची निर्मिती होईल.

सगळी राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील विद्यापीठात न्यायवैद्यक प्रयोगशाळा स्थापन करण्यात येणार असून, दर वर्षी नऊ हजार विद्यार्थ्यांना या विषयाचं प्रशिक्षण देण्यात येणार आहे, असं आश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>इंडिया-पोस्ट</u>**

देशाच्या दुर्गम भागांमध्ये सहज आणि रास्त प्रकारे घरपोच वित्तविषयक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय पोस्ट पेमेंट्स बँक म्हणजे आयपीपीबी आणि रिया मनी ट्रान्स्फर यांच्यात भागीदारी करण्यात येणार आहे. दळणवळण मंत्रालयानं याबाबत माहिती दिली. या भागिदारीमुळे ग्राहकांच्या दारापर्यंत बँक सेवा पोचतील आणि तातडीच्या गरजेसाठी पैसे काढता येतील. सुरुवातीला २५ हजार टपाल कार्यालयांच्या ठिकाणी ही सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असून, तिचा विस्तार एक लाख टपाल कार्यालयांपर्यंत करण्याची योजना असल्याचं दळणवळण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>योग-पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या जम्मू-काश्मीर दौऱ्यावर जाणार आहेत. ते ८४ विकास प्रकल्पांचं उद्घाटन करणार असून श्रीनगरमध्ये उद्या होणाऱ्या `युवकांचं सक्षमीकरण, जम्मू-काश्मीरमध्ये बदल` या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. पंतप्रधान दोन हजार जणांना सरकारी सेवेत नियुक्त्यांची पत्रं वितरित करणार आहेत. तसंच उद्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात पंतप्रधान सहभागी होणार आहेत.

**<u>नेट परीक्षा</u>**

सरकारनं यूजीसी-नेट जून २०२४ परीक्षा रद्द केली आहे. ही परीक्षा नव्यानं घेण्यात येणार असून, त्याबाबतची माहिती स्वतंत्रपणे कळवली जाणार आहे. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राकडून परीक्षा यंत्रणेत गैरप्रकारांच्या शक्यतेबाबत माहिती मिळाल्यानंतर परीक्षा रद्द करण्यात आली आहे. या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग म्हणजे सीबीआयकडे तपास सोपवण्यात आला आहे.
राष्ट्रीय परीक्षा संस्था म्हणजे एनटीएनं देशभरातल्या वेगवेगळ्या शहरांमध्ये गेल्या गुरुवारी दोन सत्रांमध्ये ही नेट परीक्षा घेतली होती.

**<u>कॅनडा</u>**

कॅनडानं इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कोर म्हणजेच IRGC या इराणी सशस्त्र दलाच्या शाखेला दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलं आहे. कॅनडाचे सार्वजनिक सुरक्षा मंत्री डॉमिनिक लेब्लँक यांनी काल ही घोषणा करताना सांगितलं की कॅनडा IRGC च्या दहशतवादी कारवायांचा सामना करण्यासाठी सर्व उपाय लागू करेल. IRGC सदस्यांसह हजारो वरिष्ठ इराणी सरकारी अधिकाऱ्यांना आता कॅनडामध्ये प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली आहे आणि जे आधीच देशात आहेत त्यांची चौकशी करून त्यांना बाहेर काढले जाऊ शकते. बँका आणि ब्रोकरेज यांसारख्या कॅनेडियन वित्तीय संस्थांना, या संस्थेची मालमत्ता ताबडतोब गोठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत आणि कॅनडा आणि परदेशातील कॅनेडियन लोकांसाठी जाणूनबुजून या संस्थेच्या मालमत्तेबाबत व्यवहार करणे हा फौजदारी गुन्हा ठरणार आहे.

धर्मादाय संस्थांनी या दहशतवादी गटांशी त्यांचे संबंध कायम ठेवल्यास त्यांचा दर्जा काढून घेतला जाईल आणि त्या गटांशी संबंधित असलेल्या लोकांना कॅनडामध्ये प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

**<u>योग दिन पोखरा</u>**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय दूतावासानं काल नेपाळमधील पोखरा इथं फेवा तलावाच्या काठी योग प्रात्यक्षिकांचं आयोजन केलं होतं. त्यात स्थानिक नागरिक, स्थानिक प्रशासन यंत्रणांचे अधिकारी, भारतीय लष्करातील निवृत्त गोरखा जवान, तसंच दूतावासातले कर्मचारी  मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<u>मिफ</u>**

अठराव्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात काल पाचव्या दिवशी  मुंबईत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठीच्या चित्रपटांचं परीक्षण केलेल्या परीक्षकांनी वार्ताहरांशी संवाद साधला. राष्ट्रीय स्पर्धेत अपूर्वा बक्षी यांच्या नेतृत्वातल्या पाच जणांच्या परीक्षक मंडळानं माहितीपट, ॲनिमेशन आणि शॉर्ट फिक्शन अशा एकंदर ७७ चित्रपटांचं परीक्षण केलं. या मंडळात ॲना हेनकेल, ॲडेल सीलमन, डॉ. बॉबी सर्मा बरुआ आणि मुंजाल श्रॉफ यांचाही समावेश होता.

**<u>तमिळनाडू विषारी दारू</u>**

तमिळनाडूमध्ये कल्लाकुरिची इथं विषारी दारूचं सेवन केल्यानं २६ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ७० पेक्षा अधिकजण उपचार घेत आहेत. याबाबत तपास सुरू आहे, असं जिल्हाधिकारी श्रावणकुमार यांनी म्हटलं आहे. बहुतांश मजुरांनी पोटदुखी, डोळ्यांत जळजळ, चक्कर येणं असे त्रास झाल्याची तक्रार केली होती. दहा मजुरांना पुढच्या उपचारासाठी पुदुच्चेरीच्या जवाहरलाल पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्थेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या प्रकरणी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

**<u>सायबरसज्जता</u>**

देशात आर्थिक क्षेत्रात सायबरसज्जता वाढवण्यासाठी भारतीय संगणक आपत्कालीन प्रतिसाद पथक म्हणजे सीईआरटी आणि मास्टरकार्ड इंडिया यांच्यात सहकार्य करार करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयानं याबाबत माहिती दिली. या दोन्ही संस्था सायबरसुरक्षिततेबाबत प्रतिसाद देण्यासाठीची यंत्रणा सक्षम करण्यासाठी एकत्र काम करतील. त्यासाठी देशभरात प्रशिक्षण कार्यक्रम आणि कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत.

**<u>गिधाड-पूल</u>**

उत्तर प्रदेशमध्ये महाराजगंज इथं आशियाई किंग गिधाड किंवा लाल डोके असलेल्या गिधाडांसाठी जगातील पहिले संवर्धन आणि प्रजनन केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे 2007 पासून आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघटेच्या लाल यादीत सूचीबद्ध गंभीरपणे धोक्यात असलेल्या या प्रजातींची संख्या सुधारेल. या केंद्राचे नाव जटायू संवर्धन आणि प्रजनन केंद्र असं ठेवण्यात आलं आहे. आशियाई किंग

गिधाडांचा अधिवास नष्ट झाल्यामुळे आणि पाळीव प्राण्यांमध्ये डायक्लोफेनाक, या दाहविरोधी औषधाचा अतिरेकी वापर, गिधाडांसाठी विषारी बनल्यामुळे त्यांचं अस्तित्व धोक्यात आलं आहे.

**<u>उष्णता-सज्जता</u>**

देशाच्या अनेक भागांमध्ये अजूनही उष्णतेची लाट कायम आहे. त्यामुळे होऊ शकणाऱ्या आजारांबाबत सज्ज राहण्याच्या आणि योग्य प्रकारे हालचाली करण्याच्या सूचना केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं राज्यांच्या आरोग्य विभागांना दिल्या आहेत. उष्णतेमुळे होऊ शकणाऱ्या आजारांबाबत म्हणजे एचआरआयबाबत माहिती पोचवावी आणि जिल्हा आणि शहर स्तरांवर आरोग्य कार्यवाही आराखड्यांची अंमलबजावणी करावी अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.

**<u>फुटबॉल</u>**

UEFA युरोपियन फुटबॉल चॅम्पियनशिपमध्ये, काल रात्री हंगेरीवर 2-0 असा विजय मिळवून अंतिम 16 मध्ये स्थान मिळवणारा जर्मनी पहिला संघ ठरला. जमाल मुसियाला आणि इल्क गुंदोगन यांच्या गोलने यजमान संघाची बाद फेरीपर्यंतची प्रगती सुनिश्चित केली. आणखी एका रोमांचक सामन्यात, स्कॉटलंडने स्वित्झर्लंडशी बरोबरी साधून शेवटच्या 16 मध्ये प्रवेश करण्याच्या आशा जिवंत ठेवल्या. दरम्यान, क्रोएशिया आणि अल्बानिया यांच्यात 2-2 अशी बरोबरी राहिल्याने स्पर्धेच्या गट टप्प्यातील उत्कंठा आणखी वाढली आहे.

**<u>टी-ट्वेंटी करंडक</u>**

पुरुषांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्वकरंडक स्पर्धेत काल दक्षिण आफ्रिकेनं अमेरिकेचा १८ धावांनी पराभव केला. या सुपर आठ गटातल्या ग्रुप दोनच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं १९५ धावांचं आव्हान अमेरिकेपुढे ठेवलं होतं. मात्र अमेरिकेचा संघ वीस षटकांमध्ये सहा गड्यांच्या बदल्यात १७६ धावाच करू शकला. आज सुपर एटमधील ग्रुप एकमध्ये भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता बार्बाडोसमधील ब्रिजटाऊनच्या केन्सिंग्टन ओव्हल इथं हा सामना सुरू होणार आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.